## :: प्रसिध्दी पत्रक ::

आरोपी लोकसेवक - श्री.सचिन भागवत सानप,मंडळ अधिकारी,बीड शहर वर्ग ३ रा.एमएसजी अपार्टमेंट,फॅलट कमांक ४,जुना नगर नाका, बीड यांना १०००००/- ( एक लाख हजार रुपये) लाच मागणी करुन स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांच्याकडुन कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | शिवाजी नगर पोलीस ठाणे बीड |
| आरोपीचे नांव व कार्यालय पत्ता | श्री.सचिन भागवत सानप, मंडळ अधिकारी, बीड शहर वर्ग ३ रा.एमएसजी अपार्टमेंट,फॅलट कमांक ४ जुना नगर नाका बीड |
| लाच मागणी रक्कम व स्वीकारली | लाच मागणी २,००,०००/- रुपये ( दोन लाख रुपये) करून तडजोडी अंती १,५०,०००/- ( एक लाख पन्नास हजार रुपये) मान्य करून १,००,०००/- रुपये ( एक लाख रुपये) लाचस्वीकारली व |
| सापळा अधिकारी | श्री.शंकर शिंदे,पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड. |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तकारदार यांचे नातेवाईक व ईतरा विरूध्द पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे मुरूम उत्खन्न संदर्भात गुरनं. २०६/२०२४ दाखल असून नमूद गुन्हयासंदर्भाने यातील लोकसेवक मंडळ अधिकारी श्री सचिन सानप यांनी बीड तरफ खोड सज्जा अंतर्गत मोची पिंपळगाव येथील गट कमांक ४९ मधील मुरूम उत्खनन जागेचा पंचानामा केला होता. नमूद पंचनाम्यात १०००ब्रास ऐवजी ५०० ब्रास उत्खनन दाखवून तकारदार यांना लाभ मिळवून देण्यासाठी लोकसेवक सचिन सानप यांनी पंचा समक्ष २,००,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोड अंती १,५०,०००/- रूपये लाच स्वीकारण्यचे मान्य करून त्यापैकी पहीला हप्ता १००००० रूपये आजच स्विकारलेण |
| थोडक्यात माहिती | दिनांक २१/०८/२०२४ रोजी तकारदार यांनी तकार दिली की माझे नातेवाईक व इतर यांचे विरूध्द गुरनं.२०६/२०२४ दाखल असून दिनांक १७/०८/२०२४ रोजी मंडळ अधिकारी श्री सचिन सानप यांनी शेत गट कमांक ४९ बीड तरफ खोड सज्जा अंतर्गत मोची पिंपळगाव येथे जावून जमीनीमधील गौण खनीज मुरूम बाबत पंचनामा केला त्यानंतर माझे मोबाईलवर संपर्क करून मला पंचनाम्यामध्ये १००० ब्रास मुरूम न दाखवता ५०० ब्रास दाखवतो म्हणजे तुला दंड कमी होईल त्या करीता तु मला २,००,००० रूपये दे असे म्हणून लाच मागणी करीत असले बाबत तकारीवरून लाच मागणी पडताळणी कारवाई करून सापळा कारवाईचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालया समोरील, श्री हॉटेल समोर बीड येथे सापळा कारवाई केली असता लोकसेवक श्री. सचिन सानप, मंडळ अधिकारी, बीड वर्ग ३ यांना तकारदार यांचे कडुन १००००० रूपये लाच रक्कम स्विकारताच लाच रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. लोकसेवक श्री.सचिन भागवत सानप, मंडळ अधिकारी, बीड शहर वर्ग ३ रा.एमएसजी अपार्टमेंट,फॅलट कमांक ४जुना नगर नाका बीड यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे शिवाजी नगर,बीड जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,मुकुंद अघाव,अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.शंकर शिंदे, पोलीस उप-अधीक्षक,बीड व सह सापळा अधिकरी श्री.युनूस शेख, पोलीस निरीक्षक,पोलीस अंमलदार सुरेश सांगळे,श्रीराम गिराम,हनुमान गोरे,सुदर्शन निकाळजे, भरत गारदे,अविनाश गवळी,राजेश नेहरकर,संतोष राठोड,अमोल खरसाडे,चालक अंबादास पुरी,गणेश म्हेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड

संकेतस्थळ :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**

2) **dyspacbbeed@gmail.com**

ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि कमांक :- १०६४

दुरध्वनी कमांक :- ०२४४२-२२२६४९

व्हॉटस अप क. :- ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :- ९९२३०२३३६१

अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :- ९८८१४६०१०३

पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड :- ९३५५१००१००

पोलीस उप अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड